विषय : कोविड-१९ विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत....(सर्व प्रकारचे हॉटेल्स, रेस्टॉरंट, खाद्यगृह, परमिटरुम, बेकरी, स्वीटमार्ट, चाट भांडार, ढाबे इत्यादी आस्थापना बंद करणे बाबत...)

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
जा.क्र.२०२१/मशाका/आ.व्य./कावि -
दि. १७/०३/२०२१

**वाचा:-** १) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा – २००५
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई -३२ यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक २४ फेब्रुवारी २०२१.
५) मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश जा.क्र. २०२०/आरबी-१/डेस्क २/टे-४/CRPC- १४४/प्र.क्र.-१३ दिनांक ०१ मार्च २०२१.
६) मा. जिल्हाधिकारी यांचे आदेश जा.क्र.२०२१/मशाका/आ.व्य./कावि-दि.१० मार्च २०२१.
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई -३२ यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक १५ मार्च २०२१.

**आदेश:-**

ज्याअर्थी, कोविड-१९ विषाणूंच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपत्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊन (Lockdown) ची घोषणा यापूर्वी केलेली असून तसेच टप्पेनिहाय लॉकडाऊन समाप्त करणे आणि निर्बंध कमी करणेसाठी **"मिशन बिगीन अगेन"** (Mission Begin Again) बाबत अधिसूचना जाहीर केलेली आहे. संदर्भीय ०४ व ०७ अन्वये दिनांक ३१ मार्च २०२१ पावेतो काही अटी व शर्तीचे अधीन राहून महाराष्ट्र राज्यात अधिसूचना जारी करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, नांदेड जिल्ह्याचे कार्यक्षेत्रामध्ये सद्स्थितीत कोविड-१९ चे मोठ्या प्रमाणावर वाढत असलेल्या रुग्ण संख्येवर आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्याचे अगत्याचे झालेले आहे, ही बाब विचारात घेऊन याबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या स्वरुपाची रूपरेषा निश्चित करण्यात येत आहे.

त्याअर्थी, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कोविड-१९ रुग्ण संख्या वाढत असल्याने संदर्भ ६ नुसार आदेश पारित करण्यात आले होते सदर आदेशात मी डॉ.विपिन इटनकर, जिल्हाधिकारी, नांदेड तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड. खालीलप्रमाणे अजून काही आवश्यक निर्बंध लागू करण्याचे आदेश उक्त अधिनियमानुसार पारीत करीत आहे.

१) नांदेड जिल्हयात सर्व प्रकारचे हॉटेल्स, रेस्टॉरंट, ढाबे, परमिटरुम, बेकरी, स्वीटमार्ट, चाट भांडार, इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरीकांची गर्दी होत आहे. त्यामुळे जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी **नांदेड जिल्हयातील सर्व प्रकारचे हॉटेल्स, रेस्टॉरंट, खाद्यगृह, ढाबे, परमिटरुम, बेकरी, स्वीटमार्ट, चाट भांडार, इत्यादी दि. १७ मार्च २०२१ ते दि. ३१ मार्च २०२१ या कालावधीमध्ये होम डिलिव्हरी चे किचन/वितरण कक्ष (Take Away) वगळता पूर्णपणे बंद करण्यात येत आहे.** होम डिलिव्हरी चे किचन/वितरण कक्ष (Take Away) हे रात्री १०:०० वा. पावेतो कोरोना प्रतिबंधक सर्व उपाययोजनांचे पालन करून सुरु ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२) जिल्ह्यातील सर्व जिम, व्यायामशाळा, सर्व प्रकारची उद्याने हे दि. १७ मार्च २०२१ ते दि. ३१ मार्च २०२१ या कालावधीमध्ये पूर्णपणे बंद राहतील.

३) संबंधित विभागांनी कोरोना जनजागृती सप्ताह सुरु करून जास्तीत जास्त प्रचार प्रसिद्धी करून नागरिकांमध्ये कोविड-१९ बाबतचे मार्गदर्शक सूचनांचे पालन करणेबाबत जनजागृती करावी.

४) तसेच कोविड-१९ बाबतीत शासनाच्या मार्गदर्शक सूचना जसे मास्क वापरणे, सामाजिक अंतर राखणे, हॅन्ड सॅनीटायझरचा वापर इ. सर्व नागरिकांवर बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे नमूद आदेश हे दि. १७ मार्च २०२१ रोजी मध्यरात्री १२:०० वाजल्यापासून ते दि. ३१ मार्च २०२१ रोजी मध्यरात्री १२:०० वाजेपर्यंत लागू राहतील. सर्व संबंधित विभागांनी या आदेशाप्रमाणे तंतोतंत पालन व अंमलबजावणी करावी.

सदर आदेशाचे कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी उल्लंघन केल्यास त्यांचे विरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ आणि साथरोग कायदा, १८९७ आणि या संदर्भातील शासनाचे इतर अधिनियम व नियमान्वये योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर आदेश आज दिनांक १७ मार्च २०२१ रोजी माझ्या सही व शिक्क्याने पारीत करीत आहे.

OFFICE OF THE COLLECTOR * NANDED *

स्वाक्षरीत/-
(डॉ. विपिन इटनकर)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

१) मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद

२) मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई

**प्रतिलिपी, माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.

२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

३) पोलीस अधीक्षक, नांदेड.

४) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

५) जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड.

६) जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. नांदेड.

७) सर्व तालुका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा.

८) सर्व मुख्याधिकारी न.प., नांदेड जिल्हा.

९) सर्व विभाग प्रमुख, जि. नांदेड.

(डॉ. विपिन इटनकर)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.**